विषय:- लोकलेखा समितीचा सन १९९४-९५ चा
२७ वा अहवाल....
शासकीय जमिनीवरील/गायरानावरील
अतिक्रमणे हटविण्याबाबत...

---

यापूर्वीच्या संबंधित आदेशांकडे नियंत्रण
अधिका-यांचे लक्ष वेधून ठोस कारवाई
करण्यास भाग पाडणेबाबत...

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्रमांक: लोलेस.१०९५/अतिक्रमणे .१०१५/प्र.क्र.४९/९५/ज-१
मंत्रालय, मुंबई: ४०० ०३२.

दिनांक:- ४.१२.१९९६.

वाचावे :- १. शासकीय ठराव, महसूल व वन विभाग, क्रमांक एलईएन.१०७८/३४६३/
ग-१, दिनांक २७.१२.१९७८.

२. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक एलईएन.२९७८/
प्र.क्र. ७८२/२९२१५/ग-३, दिनांक ३.१२.१९७९.

३. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक एलईएन.१०८२/
६६०३/ग-३, दिनांक १७.२.१९८२.

४. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक एलईएन.१०८२/३५२२/
ग-१, दिनांक १८.९.१९८२.

५. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक एलईएन.१०८२/
३३५७२/सीआर-१९४६/ग-३, दिनांक ४.१०.१९८२.

६. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक एलईएन.१०८६/१२८३/
३९४३/ग-३, दिनांक २०.२.१९८७.

७. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक एलईएन.२७८४/९७५/
सीआर-३३३५/ग-३, दिनांक ८.८.१९८८.

८. शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण.१०८८/३५९६/
प्र.क्र. २२३/ग-१, दिनांक २७.२.१९८९.

९. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एलईएन.१०९०/प्र.क्र.१७२/
ज-१, दिनांक २८.११.१९९१.

१०. शासन परिपत्रक, क्रमांक एलईएन.१०९५/प्र.क्र.६६/ज-१, दिनांक
९.८.१९९५.

रत्नागिरी.
1 JAN 1997
शाखा महसूल
प्र. लि. नि. व जि. जिल्हाधिकारी

परिपत्रक :

राज्यातील शासकीय जमिनींवर/गायरानांवर कृषि वा अन्य बिगर

कृषी प्रयोजनासाठी अतिक्रमणे सतत वाढतच असून शासनाने सदर अतिक्रमणांविरुध्द कारवाई करण्यासाठी अनेक परिपत्रके/शासन निर्णयान्वये आदेश देऊनही सरकारी जमिनींवर अतिक्रमणे करण्याच्या प्रवृत्तीत घट झालेली नाही. अतिक्रमणांकडे सोईस्करपणे डोळेझाक केली जाते. अतिक्रमण हटविण्याबाबत शासनाकडून आदेश दिले जाऊनही संबंधीत अधिकारी कारवाई करीत नाहीत. याबद्दल लोकलेखा समितीने तिच्या सन १९९४-९५ च्या सत्ताविसाव्या अहवालात तीव्र चिंता व्यक्त करुन शासनाने सर्वच अतिक्रमणांविरुध्द कठोर कारवाई करावी, अशी शिफारस केली आहे.

२. लोकलेखा समितीने अशी शिफारस केली आहे की, शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे शोधून काढण्याचे कामी आणि ती नियोजित वेळेत हटविण्याच्या कामी महसूल विभागाला अपयश आले आहे. ब-याच ठिकाणी संबंधित अधिकारी, तलाठी व अतिक्रमण करणारे यांच्या संगनमताने अतिक्रमणे होत असतात. त्यामुळे जे महसूल अधिकारी/कर्मचारी सरकारी जमिनीवरील अतिक्रमणास जबाबदार असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करावी.

३. वास्तविक पाहता शासकीय जमिनीवरील/गायरानांवरील अतिक्रमणे हटविण्याकामी व भविष्यातील अतिक्रमणांना प्रतिबंध व्हावा या हेतूने शासनाने वरील समासातील अनुक्रमांक १ ते १० अन्वये वेळोवेळी आवश्यक ते आदेश दिले आहेत. या सर्व आदेशानुसार शासकीय जमिनीवरील/गायरानांवरील सर्व प्रकारच्या अतिक्रमणांविरुध्द परिणामकारक कारवाई करता येणे शक्य होते. मात्र तसे झालेले दिसून येत नाही. त्यामुळे लोकलेखा समितीने केलेल्या शिफारसीप्रमाणे ठोस कारवाई करुन त्याप्रमाणे अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

४. लोकलेखा समितीच्या वरील शिफारसी व विचारात घेऊन असे आदेश देण्यात येत आहेत की, वरील समासातील अनुक्रमांक १ ते १० बाबत आपल्या स्तरावर काय कारवाई करण्यात आली आहे याचा अहवाल जिल्हाधिका-यांनी शासनाकडे पाठवावा. त्यात त्यांनी वरील समासातील अ.क्र. १ ते १० येथे नमूद केलेल्या आदेशाप्रमाणे/सूचनांप्रमाणे नियमित आढावा घेण्यात येत आहे किंवा कसे याचाही प्रकर्षाने खुलासा करावा.

५. सध्याचे शासकीय आदेश विचारात घेऊन अतिक्रमणांच्या संख्येत वाढ होऊ नये याकरीता शासनाच्या शेवटच्या स्तरावरील तलाठी व मंडळ निरीक्षक यांच्यामार्फत कार्यवाही अधिक कार्यक्षमपणे होईल याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एलईएन. १०९०/प्र.क्र.१७२/ज-१, दिनांक २८.११.१९९१ च्या परिच्छेद क्रमांक ८ नुसार दिलेले आदेश व

शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक एलईएन-१०९५/प्र.क्र.६६/ज-१, दिनांक ९.८.१९९५ अन्वये दिलेले आदेश विचारात घेऊन कडक कारवाई करावी.

६. लोकलेखा समितीच्या शिफारसी व शासनाचे हे आदेश संबंधितांच्या निदर्शनास आणावेत व प्रचलित स्थायी आदेश विचारात घेऊन सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे/गायरानांवरील अतिक्रमणे दूर करण्याबाबत / हटविण्याबाबत सर्व संबंधितांना पुन्हा सूचना देऊन पाठपुरावा करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ द. शि. फाटक ]
कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति